# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
**मुख्य कार्यालय** : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९१८, २५५७७९०५
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.new.srapune.gov.in

परिपत्रक क्रमांक :-०४/२०२५

प्रस्ताव शाखा

दिनांक :-१७ /०२/२०२५.

**विषय :-** अघोषित झोपडपट्ट्यांसंदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवणेसाठी झोपडपट्टी सदृष्य अहवाल मागवणे बाबतची कार्यवाही.

**संदर्भ :-** १) मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे दि. ११/१२/२०२३ रोजीचे पत्र.
२) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मनपा, पुणे यांना पाठवलेले या कार्यालयाचे दि. १९/०१/२०२४ रोजीचे पत्र.
३) अवर सचिव, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. TPS / १८२३ / १९४० / नवि-१३, दि.१४/१२/२०२३ नुसार प्राप्त लक्षवेधी सूचना व त्यासंदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने शासनास सादर केलेला अहवाल दि. १५/१२/२०२३.
४) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मनपा, पुणे यांना पाठवलेले पत्र दि.२१/०६/२०२४.
५) मा. आयुक्त महानगरपालिका, पुणे यांचे झो.पु.प्रा., पुणे कडे प्राप्त झालेले पत्र दि.१८/१२/२०२४.
६) झो.पु.प्रा., पुणे तर्फे जारी केलेले परिपत्रक क्र. २१५ दि. ०१/०७/२०१७.

झोपडपट्टी पुनर्वसन (सुधारणा निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ४ नुसार महानगरपालिकेमार्फत झोपडपट्टी घोषित करण्याची तरतूद सन २०१० नंतर निरस्त झाली असल्यामुळे घोषीत न झालेल्या प्रकरणी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासंदर्भात झोपुप्राने संदर्भिय अ.क्र. ६ वरील परिपत्रकानुसार मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहेत. सदर अधिनियमाप्रमाणे ज्या अघोषीत जागांवर झोपडपट्टी असल्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे सकृतदर्शनी मत बनत असेल अशा जागांवर पुनर्वसन योजना राबवतेवेळी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे स्तरावर सदर अधिनियमाच्या कलम ३ (क) अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत करणे अपेक्षित आहे.

महानगरपालिकेचे दि. ११/१२/२०२३ रोजीचे संदर्भ क्र. १ वर नमूद पत्रानुसार "महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील तरतूदीप्रमाणे गलिच्छ वस्ती म्हणून घोषीत नसलेल्या खाजगी मालकीच्या जागांवर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून पुणे महानगरपालिकेच्या संबंधित क्षेत्रीय कार्यालयाकडे अहवाल मागविण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे निदर्शनास आले असून ज्या प्रकरणांमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने अद्याप प्रस्ताव मान्य करणेत

आलेले नाहीत असे सर्व प्रस्ताव स्थगित करावे" असे कळवले होते. माहे डिसेंबर, २०२३ दरम्यान स्थानिक वृत्तपत्रात "झोपडपट्टी नसलेल्या जागी विकसकामार्फत पुनर्वसन झोपडपट्टी प्रस्ताव दाखल होत आहेत" अशा स्वरूपाच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या व त्यासंदर्भात संदर्भ क्र. ३ वर नमूद लक्षवेधी सूचना उपस्थित झाली होती. याप्रकरणी मनपाशी व्यापक सल्लामसलत केल्यानंतर संदर्भ क्र. ५ वरील पत्र क्र. २००८३ दि. १८/१२/२०२४ नुसार मा. मनपा आयुक्त, पुणे यांचेकडून प्राप्त अभिप्रायानुसार या प्रकरणी + अघोषीत झोपडपट्टी संदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने निर्गमित केलेले परिपत्रक क्र. २१५ दि. ०१/०७/२०१७ अधिक्रमित करण्यात येत असून विषयांकित प्रकरणी अघोषित झोपडपट्टी संदर्भात झोपडपट्टी अधिनियमाच्या कलम ३(क) अंतर्गत "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" निर्धारित करण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१) झो.पु. प्राधिकरणाकडील परिपत्रक क्र. ६/२२४ दि. ०२/०९/२०२४ नुसार विहित केल्याप्रमाणे परिपूर्ण प्रस्ताव विकसकाने झोपुप्रा कार्यालयाकडे सादर केलेला असावा. झोपुप्राकडे परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रस्ताव शाखेने झोपुप्राच्या सक्षम प्राधिकाऱ्यांचा अहवाल मागवावा.
२) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत तसेच मनपामार्फत यापुर्वी केलेले झोपडपट्टी सर्वेक्षण, झोपुप्रा / मनपा मार्फत नियुक्त मशाल / अन्य NGO यांचेकडील सर्वेक्षण आदी बाबी विचारात घेऊन संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांनी स्वत: स्थळपाहणी करून मु.का.अ., झोपुप्रा यांना वस्तुस्थितीदर्शक विहित नमुन्यातील स्वयंस्पष्ट अहवाल सादर करावा.
३) संबंधित आयुक्त, महानगरपालिका यांचेकडे अघोषीत झोपडपट्ट्यांबाबत झोपडपट्टी सदृष्य परिस्थिती बाबतचा योजनानिहाय स्वतंत्र अहवाल अग्रेषीत करण्याची विनंती मु.का.अ., झोपुप्रा यांच्या स्वाक्षरीने करावी. कोणत्याही परिस्थितीत झोपुप्रा व मनपा यांच्या निम्नस्तरीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या स्तरावर असा पत्रव्यवहार करू नये. खालील मुद्द्यांची शहानिशा करणे संदर्भात महानगरपालिका आयुक्तांना विनंती करण्यात यावी.
    a) अधिनियमाच्या कलम ४ अंतर्गत झोपडपट्टी घोषीत न होण्यामागची वस्तुस्थिती तपासून झोपडपट्टी अस्तित्वात आल्यापासून आजपर्यंतचे गुगल इमेजेस व अन्य पुरावे तपासणे.
    b) "मशाल" किंवा झोपुप्रा / मनपा नियुक्त अन्य NGO मार्फत झोपडपट्टयांचे सविस्तर सर्वेक्षण करुन यापूर्वीच अहवाल सादर झाले असल्यास तसेच अशा ठिकाणी मनपामार्फत गलिच्छ वस्ती निर्मूलन निधीतून योजना क्षेत्रात शौचालय व अन्य नागरी सुविधा पुरवल्या आहेत आणि / किंवा जेथे महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात SI/EWS झोन नमूद आहे अशा ठिकाणी झोपडपट्टी सदृष्य परिस्थिती असल्याची खात्री करणे शक्य होईल.
    c) झो.पु. योजना क्षेत्रात म.न.पा. मार्फत मिळकत कराऐवजी सेवाशुल्काची आकारणी केली आहे का याची पडताळणी करणे.
    d) झो.पु. योजना क्षेत्रामध्ये महानगरपालिकेकडून झोपडीधारकांना फोटोपास वितरीत केले असल्यास ती बाब तपासावी. महानगरपालिकेकडील वाडा पुनर्विकास यादीमधील क्षेत्रासंदर्भात आणि महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत नियोजन प्राधिकरणाने योजना क्षेत्रातील संरचनासंदर्भात अभिन्यास / बांधकाम परवानगी दिली आहे का किंवा अशा क्षेत्रासाठी मानीव परवानगी आहे का याची खात्री करणे.
    e) आरोग्य विषयक बाबी व सार्वजनिक बाबींची पडताळणी करणे.

यामध्ये उपरोक्त A ते D मधील मुद्यांव्यतिरिक्त भाडे नियंत्रण कायद्यांतर्गत मालक-भाडेकरू संबंध, शासकीय / मनपाची बांधकामे, धोकादायक बांधकामे, पाणीपुरवठा, जलनिस्सारण, मलनिस्सारण, पोच रस्ते, दलदल इत्यादी बाबतचा तपशील संबंधित मनपा उपआयुक्त स्तरावर प्रत्यक्ष स्थळ पाहणी अंती नोंदवण्यात यावा.

f) वरील मुद्द्यांव्यतिरिक्त मनपा आयुक्तांना आवश्यक वाटतील अशा अन्य मुद्द्यांची पडताळणी झाल्यानंतर संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या शिफारशीनुसार झोपडपट्टी सदृष्य परिस्थिती दर्शवणारा अभिप्राय मनपा आयुक्त निर्देशित स्तरावर अंतिम केला जावा आणि त्यानुसार योजना क्षेत्रात झोपडपट्टी सदृष्य परिस्थिती दर्शवणारा अहवाल झो. पु. प्राधिकरणाकडे सादर केला जावा.

१) अशा प्रकारे अघोषीत क्षेत्रासंदर्भात महानगरपालिकेचा झोपडपट्टी सदृष्य अहवाल झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्राप्त झाल्यानंतर झो.पु. प्राधिकरणाच्या प्रस्ताव शाखेने अशा अहवालाची प्रत झो.पु. प्राधिकरणाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडे पाठवावी. संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी मनपाकडील अहवाल विचारात घेऊन झोपडपट्टी अधिनियमाच्या कलम ३(क) अंतर्गत "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" निर्धारित करण्याबाबतची अधिसूचना प्रसिद्धीचा प्रस्ताव मु.का.अ., झोपुप्रा यांच्या निर्णयार्थ सादर करण्यात यावा.

२) ज्या अघोषित झोपडपट्ट्यांसंदर्भात पुनर्वसन योजनांना अद्याप प्रशासकीय मान्यता दिलेली नाही, अशा सर्व प्रकरणी या परिपत्रकातील सर्व तरतुदी तंतोतंत लागू करण्यात येतील.

सोबत :- मनपाकडून झोपुप्राकडे अग्रेषीत करावयाच्या प्रारूप अहवालाची प्रत.

नीलेश र. गटणे (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

प्रत :- १) मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे
२) मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे
३) सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
४) सर्व विभागप्रमुख, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.